परिपत्रक क्रमांक २९४ दिनांक २३/११/१९९८

या कार्यालयाचे आदेश (इंग्रजी) क्रमांक ३२ दिनांक २३/१/१९७९ अन्वये धर्मादाय सह आयुक्त तसेच विभागीय कार्यालयातील धर्मादाय उप आयुक्त/सहायक धर्मादाय आयुक्त यांनी वर्षभरात किती न्यायिक व न्यायिकवत प्रकरणे निकाली काढावीत याबाबतची मानके (नॉर्म) ठरवून देण्यांत आलेली आहेत.

प्रादेशिक कार्यालयाकडून दरमहा निकाली काढण्यात आलेल्या प्रकरणांची विवरणपत्रे पाहता, निकाली काढण्यात आलेल्या प्रकरणांची संख्या ठरवून दिलेल्या मानकापेक्षा खूपच कमी असल्याचे निदर्शनांस आले आहे. परिपत्रक क्रमांक ३२ दिनांक २३/१/७९ ची प्रत यासोबत पुन्हा आपल्या माहितीसाठी पाठविण्यांत येत आहे.

यापुढे ठरवून दिलेलया मानकानुसार प्रकरणे निकाली काढावीत. मानकापेक्षा निकाली निघालेल्या प्रकरणांची संख्या कमी असल्याचे आढळून आल्यास त्यबाबत गंभीर दखल घेण्यांत येईल. तसेच वर्षअखेर गोपनीय अहवाल लिहीताना निकाली काढलेल्या प्रकरणांची संख्या विचारात घेऊन संबंधित अधिकाऱ्यांच्या कामाचे मूल्यमापन करण्यांत येईल, याची नोंद घ्यावी.

धर्मादाय उप आयुक्त/सहायक धर्मादाय आयुक्त यांनी दरमहा निकाली काढलेल्या प्रकरणांची विवरणपत्रे संबंधित धर्मादाय सह आयुक्त यांच्याकडे सादर करावी. धर्मादाय सह आयुक्त यांनी त्यांच्या अधिपत्याखालील प्रादेशिक अधिकाऱ्यांच्या विवरणपत्रांची तिमाही आढावा घेऊन त्याप्रमाणे त्यांचे अभिप्राय पत्राने प्रादेशिक अधिकाऱ्यांना कळवावेत व त्याची प्रत मुख्यालयास तिमाहीनंतर १५ दिवसांचे आंत सादर करावी.

धर्मादाय सह आयुक्त यांनी निकाली काढलेल्या प्रकरणांचे विवरणपत्र प्रत्येक तिमाहीनंतर १५ दिवसांचे आंत मुख्यालयांस सादर करावे.

सही/-
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,मुंबई.

प्रत :- वैयक्तिक धारिणी